९.३०
१३.१०.२१

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

---

दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२१

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

विषय: देवी मुर्ती संकलन केंद्रांची माहिती.

संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
३) महाराष्ट्र शासन, अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १३ मार्च, २०२०
४) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१, दि. ४ जून, २०२१, दि.१७ जून, २०२१,दि. २५ जून, २०२१
५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.कोरोना २०२१/ सी.आर.३६६/आरोग्य-५ दिनांक २४ सप्टेंबर, २०२१
६) शासन परिपत्रक क्र.आरएलपी-०९२१/प्र.क्र.२२१/विशा-१ब दि.४/१०/२०२१
७) आदेश क्रमांक उमपा/आ.का/३८०/२०२१, दिनांक ४ ऑक्टोंबर, २०२१

दिनांक ०७/१०/२०२१ पासून नवरात्री उत्सवास प्रारंभ झाला असून या संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने नवरात्रौत्सव साजरा करणेबाबत मार्गदर्शक सूचना संदर्भिय क्र. ७ अन्वये निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

कोरोना/कोव्हिड महामारीच्या काळामध्ये विसर्जन स्थळी भाविकांची होणारी गर्दी टाळण्यासाठी तसेच कोरोनाचा संसर्ग पसरु नये यासाठी महापालिकेतर्फे प्रभाग समितीनिहाय दिनांक १४/१०/२०२१ रोजी देवी मुर्ती संकलन केंद्रे निर्माण करण्यात येणार आहेत. सदरहु संकलन केंद्रांवर देवी मूर्तींचा स्विकार करुन पालिकेच्या कर्मचा-यांमार्फत देवी मुर्तींचे विधीवत विसर्जन करण्यात येईल. सदरहु संकलन केंद्रांचा सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | देवी मुर्ती संकलन केंद्रांचे ठिकाण |
|---|---|
| | **प्रभाग समिती क्र. १** |
| १ | भगवंती नावानी स्टेज समोर, गोल मैदान, उल्हासनगर-४२१००१. |
| | **प्रभाग समिती क्र. २** |
| २ | बोट क्लब, हिराघाट,उल्हासनगर-४२१००३. |
| | **प्रभाग समिती क्र. ३** |
| ३ | प्रभाग समिती क्र. ३ कार्यालय, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकूल, उल्हासनगर-४२१००४. |
| | **प्रभाग समिती क्र. ४** |
| ४ | कैलाश कॉलनी, गणेश विसर्जन घाटाच्या बाजूला, उल्हासनगर-४२१००५. |

(पुढील पानावर)

शासनाने, महानगरपालिका व पोलीस प्रशासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजुन काही सूचना प्राप्त झाल्यास त्यांचे अनुपालन करणे बंधनकारक असेल.

वरील सर्व सूचनांचे पालन करुन उल्हासनगर महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मा. डॉ.राजा दयानिधी (भा.प्र.से) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी शहरवासीयांना केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका